आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ६२ वा ● शुक्रवार दि. २६ जुलै २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


## विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा विधानभवनात २८ जुलै रोजी शपथविधी

मुंबई, : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत नवनिर्वाचित झालेल्या सदस्यांचा शपथविधी रविवार २८ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ वाजता विधानभवनातील मध्यवर्ती सभागृहात (सेंट्रल हॉल) होणार आहे. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे या नवनिर्वाचित सदस्यांना शपथ देतील. विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी १२ जुलै २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. निवडून आलेले सदस्य योगेश टिळेकर, पंकजा मुंडे, परिणय फुके, अमित गोरखे, सदाभाऊ खोत, भावना गवळी, कृपाल तुमाने, शिवाजीराव गर्जे, राजेश विटेकर, मिलिंद नार्वेकर, प्रज्ञा सातव या सदस्यांचा शपथविधी होईल, असे कळविण्यात आले आहे.



## इतिहासात आजचा दिवस २६ जुलै

अंतरराष्ट्रीय

११३९ – अफोन्सो पहिला पोर्तुगालच्या राजेपदी.
१७८८ – न्यूयॉर्कने अमेरिकेचे संविधान मान्य केले व त्यायोगे अमेरिकेचे ११वे राज्य झाले.
१८४७ – लायबेरियाला स्वातंत्र्य.
१९३६ – जर्मनी व इतर मित्र देशांचा स्पॅनिश गृहयुद्धात हस्तक्षेप.
१९४१ – दुसरे महायुद्ध – जपानच्या नैऋत्य एशियातील शिरकावास प्रत्युत्तर म्हणून अमेरिकन राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डिलानो रुझवेल्टने अमेरिकेतील जपानी मालमत्ता सरकारी ताब्यात घेण्याचा आदेश दिला.
१९४५ – युनायटेड किंग्डममधील निवडणुकांत लेबर पार्टीचा विजय. विन्स्टन चर्चिलने पंतप्रधानपदाचा राजनामा दिला.
१९४७ – अमेरिकन राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रुमनने सी.आय.ए., संरक्षणखाते व राष्ट्रीय सुरक्षा समितीची स्थापना केली.
१९४८ – हॅरी ट्रुमनने अमेरिकन सैन्यातील वंशभेद नियमबाह्य ठरवला.
१९४८ – आंद्रे मरी फ्रांसच्या पंतप्रधानपदी.
१९५३ – क्युबन क्रांतीला सुरुवात.
१९५३ – अमेरिकेच्या ॲरिझोना राज्यात मोर्मोन पंथाच्या फंडामेंटालिस्ट चर्च ऑफ जिझस क्राइस्ट ऑफ लॅटर डे सेंटस या बहुपत्नीत्त्व पाळणाऱ्या मूलतत्त्ववादी उपपंथावर कार्रवाई.
१९५६ – जागतिक बँकेने आस्वान धरण बांधण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यास नकार दिल्यावर इजिप्तच्या राष्ट्राध्यक्ष गमाल नासरने सुएझ कालव्याचे राष्ट्रीयीकरण केले.
१९५७ – ग्वाटेमालाच्या हुकुमशहा कार्लोस कॅस्टियो अर्मासची हत्या.
१९५८ – अमेरिकेने एक्स्प्लोरर ४ या उपग्रहाचे प्रक्षेपण केले.
१९६३ – सिनकॉम २ या पहिल्या भूस्थिर उपग्रहाचे प्रक्षेपण.
१९६३ – युगोस्लाव्हियातील स्कोप्ये शहरात भूकंप. १,१०० ठार.
१९७१ – अमेरिकेच्या अपोलो १५ अंतराळयानाचे प्रक्षेपण.
२००६ – पॅलेस्टिनमधील गाजा शहरातील पूर्व भागात इस्त्राईलच्या विमान हल्ल्यात ७ पॅलेस्टिनी मारले गेले.
२००७ – बांगलादेशाच्या चरगाव शहराच्या एका न्यायालयाने एका उद्योगपतीच्या हत्येप्रकरणी १२ जणांना फाशीची शिक्षा ठोठावली. या प्रकरणी आठ महिलांनाही आजन्म कारवासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

राष्ट्रीय

१९६५ – मालदीवला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य.
२००२ – तत्कालीन संसद सदस्या फुलनदेवीची गोळ्या घालून दिल्लीत हत्या.
२००५ – मुंबई व परिसरात २४ तासात जवळजवळ १ मीटर (९९५ मिलीमीटर) पाऊस. महापूरात शेकडो मृत्युमुखी.
२००६ – राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना इ–मेल पाठवून जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी एका युवकाला इंदूर येथे अटक करण्यात आली.
२००७ – राष्ट्रीय विक्रमवीर प्रीजा श्रीधरनने आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पीयनशिपमध्ये म हिलांच्या १० हजार मीटर शर्यतीत रौप्य पदक जिंकले.
२००८ – अहमदाबादमध्ये १७ बॉम्बस्फोटात ५० हुन अधिक लोकांचा मृत्यू झाला.

जन्म

१०३० – संत स्टानिस्लॉ.
१६७८ – जोसेफ पहिला, पवित्र रोमन स्म्राट.
१८०२ – मेरियानो अरिस्ता मेक्सिकोचा राष्ट्राध्यक्ष.
१८५६ – जॉर्ज बर्नार्ड शॉ, आयरिश लेखक.
१८५८ – टॉम गॅरेट ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
१८७५ – कार्ल युंग, स्विस मनोवैज्ञानिक.
१९०८ – साल्व्हादोर अलेंदे चिलीचा राष्ट्राध्यक्ष.
१९२७ – जी.एस. रामचंद भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९२८ – फ्रांसिस्को कॉसिगा इटालियन प्रजासत्ताकचा ८वा राष्ट्राध्यक्ष.




## लातूर शहर जिल्हा कॉंग्रेसचे भुयारी गटारी कामाचा दर्जा चांगला नसल्याबाबत महापालिका आयुक्ताना निवेदन

लातुर प्रतिनिधी– लातूर शहरात सध्या अनेक ठिकाणी भुयारी गटारीचे काम सुरु आहेत तर काही ठिकाणी कामे पूर्णत्वास गेली आहेत सदरील कामी वापरण्यात येणाऱ्या घाण पाणी वाहून नेणाऱ्या पाईपची साईज लहान आकाराच्या आहेत भविष्यात या पाईप लहान पडून पाण्याच्या व कचऱ्याच्या ओघाने ब्लॉक होण्याची शक्यता वाटते त्यामुळे या पाईपची प्रत्यक्ष पाहणी करून आयुक्तांनी तो तात्काळ बदलावा, भुयारी गटार कामासाठी नव्याने बनवलेले रस्तेही खोदण्यात येत आहेत सदर रस्ते जेसीबी मशीनने खोदण्यात येत असल्याने पूर्ण रस्ता खराब होत आहे त्यामुळे नवीन सिमेंट रस्ता कटरच्या सहाय्याने तोडून पुन्हा पॅच करावा भुयारी गटारी कामाचा दर्जा सुद्धा चांगला नसल्याने या निकृष्ट कामाची दखल महापालिका आयुक्तांनी तात्काळ घ्यावी, असे लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने गुरुवार दि. २५ जुलै रोजी मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे.

यावेळी लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे



अध्यक्ष ड. किरण जाधव, गणेश देशमुख, प्रा. प्रवीण कांबळे, प्रवीण सूर्यवंशी, ड. देविदास बोरूळे पाटील, जालिंदर बर्डे, धनंजय शेळके, अक्षय मुरुळे, विजय टाकेकर, रत्नदीप अजनिकर, विजय टाकेकर, खाजामिया शेख, गिरीश ब्याळे, अँड. सुनीत खंडागळे, विजय गायकवाड, कुणाल वागज, अभिषेक पतंगे, पिराजी साठे, शेख कलीम, आकाश मगर, राजू गवळी आदी उपस्थित होते.

## दूध भेसळखोरांविरोधात कठोर कारवाईसाठी राज्याचा स्वतंत्र कायदा करणार

मुंबई, : दूध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी एमपीडीएपेक्षाही कठोर असा राज्याचा स्वतंत्र कायदा करावा लागेल. तसेच अन्न पदार्थातील भेसळखोरांवर अजामीनपात्र गुन्हा दाखल व्हावा यासाठी केंद्राला शिफारस करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे सांगितले. राज्यातील दुधातील भेसळखोरांविरोधात अन्न व औषध प्रशासन आणि दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांनी संयुक्त मोहीम प्रभावीपणे राबवून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये गुणवत्ता वाढीसाठी व्ही. रमणी पॅटर्न राबविणे तसेच राज्यातील दूध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळीविषयी आयोजित संयुक्त बैठकीत मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा अत्राम, माजी आमदार सुरेश धस यांच्यासह मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. आय. चहल, दुग्ध व्यवसाय विकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेशकुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, अन्न व औषश प्रशासन विभागाचे सचिव दिनेश वाघमारे, शालेय शिक्षण विभागाचे सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, तसेच केंद्रीय एफएसएसएआयचे अधिकारी आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, अन्न पदार्थातील भेसळ ही गंभीर बाब आहे. यामुळे विशेषतः लहान मुलांच्या आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम होतो. त्यामुळे आपल्या भावी पिढीचेही नुकसान होणार आहे. कर्करोगांसारखा दुर्धर आजारही अनेकांना जडतो. त्यामुळे भेसळखोरांवर एमपीडीएपेक्षांही कठोर कारवाई होणे आवश्यक आहे.

## भोसी गावात चोरट्यांची धाडसी चोरी ; रोकड, दागिन्यासह तब्बल ५ लाखाचा ऐवज लंपास

**भोकर – तालुक्यातील मौ .भोसी येथील शेतकरी कल्याणकर यांच्या वाड्यात अज्ञात चोरटे यांनी गेटचे व घराचे कुलुप तोडून मंगळवार ते बुधवारच्या मध्यरात्री सोने , चांदी , रोख रक्कमेसह तब्बल पाचलाखाच्यावर ऐवज लुटुन चोरटे पसार होण्यात यशस्वी झाले आहेत.**

सविस्तर माहिती असी की मौ. भोसी येथील सचिन दिपकराव कल्याणकर देशमुख कुटुंबीय रात्रीला जेवण करून वेगवेगळ्या रुम मध्ये झोपले होते सचिन यांचे वडील दररोज रात्रीला जागी असायचे पण त्या रात्रीला सर्वांना गाढ झोपी गेल्याने रात्रीला रिमझिम पाऊस पडत होता अज्ञात चोरटे या पावसाचा फायदा घेत गेटचे आणि घराच्या दाराचेही कुलुप तोडून आत प्रवेश करून घरातील कपाटाच्या लॉकरचे लॉक तोडून त्यातील १२ तोळे सोन्याचे गंठण , लक्ष्मी हार , मोतीमाळ , कर्णफुले , पेशवाई झुमके, चांदीचे दागिने व नगदी पन्नास हजाराची रोकड असा पाच लाखाचा ऐवज चोरून अज्ञात चोरटे लंपास झाले बुधावार दि . २४ जुलै रोजी सकाळी दिपक कल्याणकर हे बाहेर निघाले असता घराचे व गेटचे कुलुप तोडल्याचे निदर्शनास आल्याने घरात चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

कपाटाची पहाणी केली असता त्याचेही लॉक तोडल्याचे दिसून आले व कपाटातील सोनेचांदीचे दागीने व नगदी पन्नास हजार रोकड चोरीस गेल्याचे लक्षात आल्याने सचिन कल्याणकर यांनी पोलीसात तक्रार दिल्याने गुरन २५२ कलम ३३१ (४) ३०५ (अ) भारतीय न्याय संहितेप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.घटनेची माहिती समजताच अप्पर पोलीस अधिक्षक डॉ . खंडेराय धरणे उपभागिय अधिकारी, सहायक पोलीस उपनिरीक्षक संभाजी हनवते यांनी भेट देऊन घटनेची पहाणी केली असून पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र मारकड यांच्या मार्गदर्शनाखाली घटनेचा पुढील अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना राठोड ह्या करत आहेत.

## लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची घेतली भेट !

लातुर प्रतिनिधी–लातूरचे नवनीर्वाचीत खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी गुरुवारी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन मतदार संघातील प्रश्नावर चर्चा केली. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लातूर – कुर्डूवाडी– टेंभुर्णी या महामार्गाच्या चौपदरीकरणासह सर्व विषय मार्गी लावण्याचे आश्र्वासन दिले.

लातूरचे नवनीर्वाचीत खासदार डॉ. शिवाजी काळगे आता मतदारसंघातील समस्या सोडविण्यासाठी चांगलेच सक्रीय झाले आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशनास जाण्यापुर्वी त्यांनी लातूर येथे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या समवेत लातूर जिल्हा व लातूर लोकसभा मतदार संघातील विकासात्मक प्रकल्पा बाबत चर्चा केली होंती. लातूर टेभुर्णी रस्त्याच्या चौपदरीकरणाचा विषय अनेक दिवसापासून प्रलंबित राहीला आहे. शहरातील गरुड चौक ते अहिल्यादेवी होळकर चौक या दोन महामार्गाला जोडणाऱ्या लिंकरोडला मंजुरी



घेणे, शहरातील साईनाका ते एमआयटी कॉलेज या राष्ट्रीय महामार्गावर स्ट्रीटलाइट लावणे, काही महामार्गांची दुरुस्ती करणे यासह विविध मागण्याची आमदार देयामुख यांची निवेदणे यावेळी त्यांनी सोबत घेतली होती. गुरुवारी सकाळी खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन मतदार संघातील प्रश्नावर चर्चा केली, लातूर टेंभुर्णी महामार्गाचे चौपदरीकरण, गरुड चौक ते अहिल्यादेवी होळकर चौक या दोन महामार्गाला जोडणाऱ्या लिंकरोडला मंजुरी घेणे, शहरातील साईनाका ते एमआयटी कॉलेज या राष्ट्रीय महामार्गावर स्ट्रीटलाइट लावणे, या निवेदनासह शिरुर ताजबंद – उदगीर, घरणी – निटूर, लामजना – निलंगा या लिंकरोड मागणी संबंधी व इतर काही निवेदणे रस्ते वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे सादर केली. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सर्व विषयावर विस्तृत चर्चा केली, सर्व समस्या समजून घेतल्या सर्व विषय प्राधान्यक्रम लावून सोडविले जातील, असे आश्र्वासन दिले. लातूर – कुडूवाडी – टेभुर्णी या महामार्गा संदर्भात त्यांनी संबंधीत अधिकाऱ्याकडे विचारणाही केली हे विषय ताबडतोब मार्गी लावण्या संदर्भात संबधितांना त्यांनी सुचनाही केल्या आहेत.

# दिंद्रुड येथील खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या पोलीस निरीक्षक केतन राठोड व तहसीलदार वर्षा मनाळे यांना निलंबित करा,

## दिंद्रुड सकल मुस्लिम समाजाच्या वतीने आमरण उपोषण

**माजलगाव (प्रतिनिधी)तालुक्यातील दिंद्रुड येथिल सकल मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने उपविभागीय अधिकारी माजलगाव कार्यालयासमोर दि.२४ बुधवार रोजी सकाळी ११ वा.पासुन अमरण उपोषण करण्यात आले. यावेळी खालील मागण्या दिंद्रुड येथील मयताच्या कुटुंबियांवर कायद्याचा दुरुपयोग करून अन्यायकारकरित्या ७४ जणांवर दाखल केलेला गुन्हा न.२७५ /२०२४ तात्काळ रद्द करून पोलीस निरीक्षक केतन राठोड यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी. राजकीय दबावाला बळी पडुन २५/०४/२००२४ रोजी तहसीलदार वर्षा मनाळे यांनी चुकीचे आदेश दिल्याबद्दल यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावी.**

मौजे दिंद्रुड शिवारातील गट क्र.७१३ मधील १ हेक्टर २० आर जमीन ज्यांची महाराष्ट्र शासन राजपत्रात १४ फेब्रुवारी १९७४ मध्ये मुस्लिम कब्रस्तान यांची नोंद आहे.त्या जमिनीमध्ये भरत असलेले अनधिकृत आठवडी बाजार तात्काळ बंद करण्यात यावे.दि.२० /११/ २००७ रोजी जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय बीड यांनी ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय दिंद्रुड तालुका माजलगाव यांना दिलेल्या पत्रात बाजार भरण्यास सक्त मनाई केलेली आहे.त्या आदेशाचे पालन करावे.दि.२७/ ७ /२०१६ /रोजी भूमि अभिलेख महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत गट क्रमांक ३३१ झालेले मोजणी



मोर क्रमांक ७२/२०१६ यांच्या मोजणी नुसार सदर कब्रस्तानची जमीन अतिक्रमण मुक्त करून घ्यावी वरील सदर मागण्या तात्काळ माण्य करून कब्रस्तानची विटंबना तात्काळ थांबवावी याकरिता दिंद्रुड येथिल सकल मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने आमरण उपोषण उपविभागीय अधिकारी माजलगाव येथे करण्यात आले.

मा.उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन करुन मयतास दफन विधी साठी घेवून गेले या सर्व प्रकरणात दिंद्रुड परिसर असेल किंवा माजलगाव शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीत असेल मयताच्या नातेवाईकांनी कसल्याही प्रकारे कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचे कार्य केलेले नव्हते व प्रशासनाला पुर्ण सहकार्य केले असे असतांना ही माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक केतन राठोड यांनी राजकीय दबावापोटी जानीव पूर्वक मयताच्या नातेवाईकांना लक्ष करीत आपल्या पदाचा दुरुपयोग करुन मयताचे ४ नातेवाईक व इतर ७० ते ७४ जनांविरुद्ध गुन्हा नं.२७५/२०२४ हा खोटा गुन्हा दाखल केला. व दि.०७/ ०७/२०२४ च्या रात्रीपासुन ते दि.०८/०७/२०२४ च्या संध्याकाळी ०६ वाजे पर्यंतच्या भूखेने व्याकुल झालेल्या मानसीक दृष्ट्या खचलेल्या भयभित झालेल्या नातेवाईकास वेठ्ठीस धरले म्हणुन मा. साहेबांनी सदर दाखल केलेले खोटे गुन्हे तात्काळ वापस घेण्याचे आदेशीत करावे व माजलगाव शहरात व तालुक्यातील मुस्लीम अल्पसंख्यांकांना पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद घेवून येणाऱ्या मुस्लीम फिर्यादीला शिवी गाळ करणाऱ्या मुस्लीम समाजाबद्दल द्वेश भावनेनेन कार्यवाही करणाऱ्या जातीयवादी मानसीकता बाळगुन कार्य करणाऱ्या माजलगाव शहर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक केतन राठोड वर चौकशी करुन निलंबन करावे आणी माजलगाव तहसिलदार वर्षा मनाळे यांची चौकशी करुन निलंबन करावे,व अन्य आम्ही सर्व मयताचे नातेवाईक दिंद्रुड शहरातील मुस्लीम नागरीक दि.२४ / ०७/२०२४रोजी माजलगाव उपविभागीय कार्यालया समोर अमरण उपोषण करण्यात आले.यावेळी मा.उपविभागीय अधिकारी माजलगाव यांनी लेखी पत्र दिंद्रुड येथिल उपोषण कर्त्यास देवुन कळविले की, दिंद्रुड च्या प्रकरणात वरील विषयात कार्यवाही करण्याचे अधिकार मा जिल्हाधिकारी बीड यांना असल्याने दिंद्रुड येथिल सकल मुस्लिम समाजाच्या वतीने अमरण उपोषण मागे घेण्यात आले पुढील उपोषण मा.जिल्हाधिकारी कार्यालय येथे करण्यात येईल,असे दिंद्रुड येथिल ग्रामस्थांनी सांगितले आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## पक्ष देईल जबाबदारी स्वीकारुन सर्वांना सोबत घेऊन विधानसभेला सामोरे जाऊ - माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर : केंद्रामध्ये आणि राज्यामध्येही महायुतीची सत्ता आहे. त्यामुळे अनेक लोकहिताचे निर्णय घेऊन भाजपाने सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र शासनाने शेतकरी सन्मान योजनेसह अनेक शेतकरी हिताच्या योजना लागू केल्या आहेत. तर राज्य शासनाने १ रूपयामध्ये पिक विमा, मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून दीड हजाराचे अनुदान, मुलींना १०० टक्के उच्चशिक्षण मोफत असे अनेक निर्णय घेऊन शेतकरी व महिलांनाही आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम केलेले आहे. परंतु १९८० पासून ते आजपर्यंत साधारणपणे ४० वर्ष काँग्रेसकडे लातूरची सत्ता होती. परंतु त्यांनी कुठलाही विकास केलेला नाही. त्यामुळे या देशमुखशाहीला लातूरकर कंटाळले आहेत. त्यामुळे महायुतीच्या माध्यमातून लातूर शहरातील विकासाला गती देण्याचे काम करू, पक्ष देईल ती जबाबदारी स्वीकारून सर्वांना सोबत घेऊन विधानसभेला सामोरे जाऊ असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते जेएसपीएम संचालित पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या सभागृहात जननायक संघटनेच्यावतीने आयोजित विशेष बैठकीत बोलत होते. यावेळी या बैठकीला, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर,जननायक संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष एस.आर.मोरे, भाजपा युवा नेते तथा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, जननायक संघटेनेचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, भाजपा ग्रामीण जिल्हा सचिव निळकंठराव पवार, जननायक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे माजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी बी.टी. कदम, जननायक संघटनेचे रेणापूर तालुकाध्यक्ष अप्पासाहेब पाटील, जननायक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब देशमुख, प्रा.डॉ. सतीश यादव, जननायक संघटनेचे लातूर तालुका अध्यक्ष रविंद्र कांबळे, महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्षा सहारा शेख, ज्योतीताई भोकरे, भोसले मॅडम, महादेवराव गायकवाड, राजेसाहेब देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, वीस वर्षापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी सिनाकोळेगाव येथून पाणी आणण्याच्या योजनेचे भूमिपूजन केले होते. परंतु अजूनही लातूरकरांचा पाणी प्रश्न मिटलेला नाही. त्यानंतर त्यांचे चिरंजीव अमित देशमुख यांनीही विधानसभा निवडणुकीपूर्वी दोन महिण्यात उजनीचे पाणी आणू अन्यथा आहे त्या पदाचा राजीनामा असे जाहीर भाषणात सांगितले होते. त्यानंतर ते मंत्रिपदावरही गेले तरीही त्यांनी उजनीचे पाणी आणलेले नाही आणि आहे त्या पदाचा राजीनामाही दिलेला नाही. त्यामुळे देशमुखांना सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही. आपण मात्र आमदार असताना लातूरच्या पाणीप्रश्नासाठी १४० कोटीची पाणीपुरवठा योजना आणली.

२५ हजार भूकंपग्रस्ताना प्रत्येकी ३५ हजारांचे अनुदान मिळवून देऊन आधार देण्याचे काम केलेले आहे. परंतु साडेआठ वर्षे मुख्यमंत्री व वीस वर्षे मंत्री राहूनही देशमुख परिवारांनी मात्र लातूरकरांचा कुठलाही विकास केलेला नाही. त्यांच्या या देशमुखशाहीला लातूरची जनता कंटाळली असून येणार्या विधानसभा निवडणुकीमध्ये आपण भाजपाच्या पाठिशी रहावे आपण लातूरचा विकासाच्या माध्यमातून चंदीगढ बनविण्याचे काम करू असा विश्वासही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

# मागासवर्गीयच्या निधीवर सरकार डाका टाकते तेव्हा आरक्षण लाभार्थी अधिकारी काय करतात?.

मागासवर्गीयच्या करिता अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या निधीचा वापर केल्या जात नाही.त्यामुळेच खर्च न झालेल्या निधीकडे अर्थ मंत्रालय आणि विशेष मनुवादी मानसिकता असणारे अधिकारी ही विशेष बाब मुख्यमंत्री व अर्थ मंत्री यांच्या लक्षात आणून देतात.तेव्हा प्रथम ही निधी का वापरली नाही यांचे स्पष्टीकरण मागीतल्या जाते. योग्य उतर न मिळाल्या मुळेच हा निधी फिरविला जातो.त्याला मागासवर्गीय अधिकारीच जास्त जबाबदार असायला पाहिजे.हे हरामखोर आरक्षणचे लाभार्थी मनुवादी विचारधारेच्या संघटनेचे सभासद असतात. स्वतच्या व्यक्तिगत फायद्यासाठी हे मागासवर्गीय समाजाच्या अनेक योजनाची प्रभावी अंमलबजावणी करीत नाही. योग्य वेळी आवाहल सादर न करणे,खर्चाचे अंदाज पत्रक वेळीच सादर न करणे. त्यामुळेच बार्टीच्या अनेक पदवीधर विद्यार्थ्यांना जन आंदोलन करावे लागते. मग तिथे असणारे आरक्षणाचे लाभार्थी अधिकारी काय झक मारत असतात.कारण अधिकाऱ्यांना विचारात घेतल्या शिवाय कोणतेही सरकार कोणताही निर्णय घेत नसते,कारण शासनकर्ती जमात हे अधिकारी असतात,अधिकारी विषमतावादी विचारांच्या ट्रेंड युनियन चे समर्थक असतील तर ते सत्ताधारी राजकर्त्यानां सल्ला देत असतात,आणि ही निधी पळवा पळवी करतात.सरकार कोणाचेही असो सामाजिक न्याय विभागाच्या निधीवर मागासवर्गीयच्या हक्काच्या निधीवर कोणत्याही विचाराचे सरकार डाका का टाकते. मग ते कर्नाटक मधील कोंग्रेस कॉग्रेसचे असो किंवा भाजपा शिवसेना,युती,महायुतीचे सरकार असो.

महाराष्ट्रातील सरकार मधील वित्तमंत्री मा.अजितदादा पवार यांनी नेहमीच वेळेवेळी मागासवर्गीयच्या करिता अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या निधीवर कायम कब्जा करून इतरत्र वळवित आले आहेत.त्याविरोधात आंबेडकरी विचारांच्या संघटनांनी जन आंदोलने केली. पण इतर मागासवर्गीय समाजाच्या संस्था,संघटना यांनी आंदोलन केली आहेत काय?.मागासवर्गीय समाजाच्या योजनाचा निधी खर्च होणार नाही,करणार नाही असेच मानसिक गुलाम अधिकारी तिथे बसवून ठेवलेल असतात. एका तरी अधिकाऱ्याने किंवा त्यांच्या मागासवर्गीय अधिकारी सभासद असलेल्या राजपत्रित अधिकारी महासंघाने याविरोधात आवाज का उचलला नाही. आणि या राजपत्रित अधिकारी महासंघ आवाज उचलला नाही म्हणून या महासंघाचा सभासद म्हणून राजीनामा देणारा एक तरी मागासवर्गीय आरक्षणाचा लाभार्थी अधिकारी आहे काय?. निधी खर्च केला नाही म्हणून कारवाई का होत नाही.आणि खर्च करणाऱ्या अधिकाऱ्यांची ताबडतोब उचल बांगडी केली जाते. मग समाज त्यासाठी जनआंदोलन करतो. समाजाशी सामाजिक वैचारिक बांधिलकी ठेवणार अधिकारी सकारात्मक विचाराने योजनेची अंमलबजावणी करतात. आणि समाजाशी सामाजिक वैचारिक बांधिलकी न ठेवणार अधिकारी नकारात्मक विचाराने योजनाची अंमलबजावणी करणार नाही.अशा नकारात्मक विचारांचे आरक्षणाचे लाभार्थी मागासवर्गीय स्वार्थी अधिकारी बाबासाहेबांच्या कामगार ट्रेड युनियनशी बेइमान झाले आहेत. ते मनुवादी विचारांच्या ट्रेड युनियन मध्ये सभासद असतात किंवा स्वतची संघटना काढून संलग्न झालेले असतात. त्यांना मंत्रालयात महापुरुषांची जयंती,स्मृतीदिन साजरा करण्याचा आणि बदली करण्याचा अधिकार मिळाला असतो. हेच त्यांचे काम असते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) २०१८ च्या बॅच १९४ विद्यार्थी पी.एच.डी.साठी नोंदणी करून प्रवेश घेतला होता. मग त्यांना फेलोशिप द्यावी लागेल. हे त्या संस्थेचा व्यवस्थापिकीय संचालक,सचिव होता त्याला यासाठी तरतूद करून ठेवण्याची आवश्यकता का वाटली नाही.या विद्यार्थ्यांना विधपीठ अनुदान आयोगाच्या (यू जी सी) मार्गदर्शक तत्वाप्रमाणे पीएच. डी फेलोशिप साठी निधी दिल जातो.२०१८ च्या एमफील करणाऱ्या विद्यार्थ्यांना पीएच. डी.फेलोशिप देण्याचा निर्णय दोन वेळ मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत घेण्यात अल.पण त्या निर्णयाला शासनची मंजूरी मिळाली नाही. मग प्रश्न उपस्थित होतो की मंत्रमंडळींच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी कोण करीत नाही. मग शासन म्हणजे कोण?.सत्ताधारी राज्यकर्ते की कायमस्वरूपी शासकीय सेवा देणारे प्रशासकीय अधिकारी?.आम्ही सर्व प्रकारचे जनआंदोलन करतो ती सरकारच्या चुकीच्या निर्णया विरोधात असतात.पण कुठे ही आंदोलन करण्यासाठी पोलिस परवानगी लागते. बहुसंख्य पोलिस यांची मानसिकता ही नकारात्मकच असते पहिल्याच भेटीत भीती दाखवून उडवून लावतात. आपण कायद्यावर बोट ठेऊन बोललो की परवानगी देतात.पण पुढची संबंधित मंत्री सचिव यांना भेट घडवून आण्याची जबाबदारी शेवटी पोलीसच बजावत असतात. गेल्यावर्षी ही बार्टीचे झहव चे शिक्षण घेणारे विद्यार्थी फेलोशिप करिता भर पावसात किती दिवस आझाद मैदानात आंदोलन करीत होते. कोणी दखल घेतली नाही. अनेक संस्था संघटना आणि नेत्यानी आझाद मैदानात येऊन पाठिंबा दिला.पुढे काय झाले?. आणि आता लॉन्ग मार्च पुणे ते मुंबई करीत असतांना त्यांना मुंबईच्या सीमेवर धडक मानणार्या विद्यार्थ्यांना पोलिसांनी अडवले आहे.परदेशी शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांना तुटपुंजी शिष्यवृत्ती ऑफर केली जात आहे. परदेशी उच्च शिक्षण घेऊ पाहणार्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवण्या करिता अडचणी वाढउन त्याच्या करिता अटी नियम जाचक केल्या जात आहेत.हे कोण करते?.मंत्र्यांना ही माहिती कोण देत असतो?.आमदारचे मंत्री झालेले राजकीय भाषणबाजी व राजकारण करू शकतात. पण त्यांना वेगवेगळ्या खात्यातील अटी व नियमाची माहिती हे प्रशासकीय अधिकारी देत असतात. त्यात मागासवर्गीय एस सी,एसटी,ओबीसी,इतर अधिकारी कमी का पडतात.कारण ते संघटित नाही. स्वार्थासाठी ते मनुवादी विचारधारेच्या संघटनेचे सभासद असतात.त्यामुळेच धोरणात्मक निर्णयाच्या समर्थनार्थ ते गप्प असतात.त्यांना मागासवर्गीय समाजाचे काही घेणे देणे नाही.ही लाचारी आहे.आरक्षणच्या लाभार्थी अधिकाऱ्यांची.मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्या करिता अडथळे निर्माण करून त्यांना वेळेवर तुटपुंजी का असणारी जी शिष्यवृत्ती मिळते ती सुद्धा शिष्यवृत्ती अदा केली जात नाही किंवा वेळेवर मिळत नाही.अशा वेळी ही आरक्षणाचे लाभार्थी अधिकारी संबधित अधिकाऱ्यांवर कोणताही दबाव का आणीत नाही. तेव्हा या हरामखोरांना बाबासाहेबांनी सांगितलेल शासन कर्ती जमात बना व शासन यंत्रणेवर कायम दबाव निर्माण करा! हे का आठवत नाही.

मा.अजित दादा पवार अर्थमंत्री यांनी मागे पत्रकार परिषेद मध्ये जाहीर पणे म्हणाले होते की झहव करून काय दिवे लावणार आहेत?. यावरूनच त्यांचा मागासवर्गीय आणि मागासवर्गीय उच्च शिक्षण घेणार्या मुलांच्या शिक्षणाच्या प्रति त्यांचा आकस, उदासीन दृष्टिकोन दिसून येतो.त्याला ही हिंमत कोणाकडून मिळते.मागसवर्गीयांना अनुदान देण्याची तरतूद खूप केली असते. पण त्याचे योग्य वाटप होते काय?.किती उदाहरण देता येतील.घरकूल योजनेचा निधी वेळेवर दिल्या जात नाही. त्यामुळे घरकुल अर्धवट राहते.अत्याचार अन्याय ग्रास्थ पीडितांना महिनो महीने चकरा माराव्या लागतात.तरी नुकसान भरपाई मिळत नाही,आंतरजातीय विवाह करणार्या जोडप्यांना अनुदान दिले जात नाही.ते चकरा मारणे सोडून देतात. आपोआप निधी पाडून राहतो. निधीचा वापर होणार नाही याचीच काळजी कोण कोणते अधिकारी घेतात. मागासवर्गीय समाजासाठी असणाऱ्या खात्यात बहुसंख्य मागासवर्गीय अधिकारी असतांना असे का होते. त्याला ह्या अधिकाऱ्यांची मानसिकता जबाबदार नाही काय?.

मागासवर्गीय आरक्षित जागांवर निवडून गेलेल्या लोकप्रतिनिधी यांनी तरी याबाबत बोलावे.पण ते पक्षाच्या विचारधारा आणि आचार संहिता नुसार बोलू शकत नाही. मागासवर्गीय समाजाने यांना आपल्या जातीचा उमेदवार म्हणून फक्त मतदान करावे. आणि हा निवडून गेल्यावर पक्षाच्या विचारधारा आणि आचार संहिता काटेकोर पणे पाळणार.म्हणूनच सरकार कोणाचे ही असो ते आमदार अधिकारी यांचे मत घेतल्या शिवाय निर्णय घेत नाही.ज्यांचा काही संबंध नसताना काही संघटना मागासवर्गीय निधी बाबत मोर्चे,धरणे जन आंदोलने करीत असतात. म्हणूनच मी विचारतो मागासवर्गीय निधी वर सरकार डाका टाकते तेव्हा आरक्षण लाभार्थी अधिकारी काय करत असतात?. आमदार व अधिकाऱ्यांना विचारात घेतल्या शिवाय सरकार कोणताही निर्णय घेत नसते,कारण शासनकर्ती जमात हे अधिकारी असतात,मागासवर्गीय अधिकारी विषमतावादी विचारांच्या ट्रेंड युनियन चे समर्थक असतील तर ते सत्ताधारी राजकर्त्यानां बोलू शकत नाही.म्हणूनच मागासवर्गीयांच्या हक्काच्या या निधीची पळवा पळवी होत असते.अधिकाऱ्याबाबत माझे हे मत चुकीचे असू शकते. मी या लेख द्वारे प्रशासकीय अधिकाऱ्यांना जाहीर आव्हान करतो की त्यांनी आरक्षणचे लाभार्थी म्हणून कर्तव्य दक्षता दाखवली काय?. बाबासाहेबांनी शासन कर्ती जमात बनावे!. हे कोणाला सांगितले होते ?.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई.**
**अध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्य.**

## डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेसाठी १५ सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव सादर करावेत

लातूर (जिमाका) : राज्यातील नोंदणीकृत मदारसांना आधुनिकीकरणासाठी डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना राबविण्यात येत आहे. ही योजना ११ ऑक्टोबर, २०१३ आणि २२ डिसेंबर २०२३ च्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येणार आहे. तरी याबाबतचे प्रस्ताव संबंधित संस्था, मदरसा चालकांनी १५ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करण्याचे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी यांनी केले आहे.

डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण या नियमितपणे राबविल्या जाणाऱ्या योजनेतंर्गत संस्थाचालकांनी, मदरसा चालकांनी ११ ऑक्टोबर, २०१३ व दि. २२ डिसेंबर, २०१३ च्या शासन निर्णयाप्रमाणे विहीत नमुन्यात रीतसर परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, बार्शी रोड, लातूर या कार्यालयास १५ सप्टेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी, असे जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी कळविले आहे.

## लातूर जिल्हा होमगार्ड रिक्त जागा भरण्यासाठी १६ ऑगस्टपर्यंत नाव नोंदणीचे आवाहन

लातूर, (जिमाका) : लातूर जिल्हा होमगार्डमधील रिक्त असलेल्या १४३ जागा भरण्यासाठी होमगार्ड नोंदणीचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी २६ जुलै, २०२४ ते १६ ऑगस्ट २०२४ रोजी अखेर सायंकाळी ५ वाजपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. होमगार्ड नोंदणीचे माहितीपत्रक, नियम व अटी याबाबत विस्तृत माहिती https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php या संकेतस्थळावर महाराष्ट्र राज्य होमगार्ड नोंदणी -२०२४ या टॅब अंतर्गत उपलब्ध आहे. तरी होमगार्डमध्ये सेवा देवू इच्छिणाऱ्या लातूर जिल्ह्यातील रहिवाशी उमेदवारांनी नोंदणीसाठी या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांनी केले आहे.

## अल्पसंख्यांक विद्यार्थी बहुल शैक्षणिक संस्थांनी पायाभूत सुविधा अनुदानासाठी १५ सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

लातूर, (जिमाका): राज्यातील धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित, विना अनुदानित अथवा कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका तथा नगरपरिषद शाळा व दिव्यांग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. यासाठी १५ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी केले आहे.

अल्पसंख्यांक विकास विभागाच्या ७ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व दिव्यांग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने संस्थाचालकांनी ७ ऑक्टोबर, २०१५ च्या निर्णयाप्रमाणे विहीत नमुन्यात रितसर परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, बार्शी रोड, लातूर या कार्यालयात १५ सप्टेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करावेत, मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, असे जिल्हा नियोजन अधिकारी श्री. रेड्डी यांनी कळविले आहे.

## राजर्षी शाहू महाराज यांच्या आरक्षण घोषणेचा १२२ व्या दिन आरक्षण देणारे राजर्षी शाहूमहाराज मराठा ओबीसी समाजाचे समजून घ्यावे?.

महाराष्ट्र राज्यात आजच्या घडीला मराठा विरोधी ओबीसी आरक्षणच्या मुद्दामुळे स्पोटक संवेदनशील झाले आहे. राजकीय पक्ष कोणतीही ठोस भूमिका घेण्यास असमर्थ आहेत. प्रत्येक नेत्याला वाटते धरले तर चावते आणि सोडले तर पाळते. मग विचारकरा २६ जुलै १९०२ ला देशात आरक्षण ही संकल्पनाच राजर्षी शाहू महाराजांनी सुरू केली,तेव्हाची परिस्थिती कशी असेल.आजचा मराठा सर्व ठिकाणी गरीब असल्या तरी स्वताला सवर्ण समजतो. आणि इतरांना लाचार समजतो.कारण इतिहास सांगतो मराठा समाज हा देणारा होता.म्हणूनच राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात मागासवर्गीय आणि आर्थिक दुर्बलांसाठी ५० टक्के आरक्षण लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय १९०२ मध्ये त्यांनी घेतला होता. वेगवेगळ्या नावांनी काम करणाऱ्या मराठा संघटना आज शिवाजी महाराज,जिजाऊ यांची नावे घेतात,परंतु शाहू महाराज अनेकांना अडचणीचे वाटतात.कारण शाहू महाराजांना स्वीकारले,तर आरक्षणाचे समर्थन करावे लागते.आणि आरक्षणाचे समर्थन करून मराठयांचे संघटन बांधता येत नाही.म्हणून मनोज जरांगे फक्त आरक्षण मागतात बाकी काही नाही. पण राजर्षी शाहू महाराज वाचत नाही. मराठे ओबीसी विसरतात की फुले-शाहू-आंबेडकर हे आधुनिक महाराष्ट्राचे,पुरोगामी महाराष्ट्राचे प्रेरणास्त्रोत आहेत.परंतु महाराष्ट्राच्या एकूण समाजकारणावर जात वास्तवाचा मोठा प्रभाव असल्यामुळे महापुरुषांचा नामोल्लेख करताना ही अनेकांची अडचण होताना दिसते.महात्मा फुले यांना माळी समाजाने मना पासुन कधीच दैवत मानले नाही, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना सर्व दलितांनी आपले दैवत बनविले पण किती मानले हा प्रश्न आहेच?. राजर्षी शाहू महाराज यांना स्वीकारणे मराठा समाजासाठी तेवढे सोपे नव्हते.आजही नाही.आजही मराठय़ांना शाहू महाराज अडचणीचेच वाटतात.कारण सामाजिक बंधुभाव,समता,दलित बांधवांचा उद्धार, शिक्षण,शेती,उद्योगधंदे,कला व क्रिडा,आरोग्य आदी क्षेत्रात अमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी ज्यांनी शर्थीचे प्रयत्न केले,ते आधुनिक भारताचे भाग्यविधाते,आरक्षणाचे जनक यशवंत जयसिंगराव घाटगे म्हणजेच छत्रपती शाहू महाराज,पारतंत्र्य,दुष्ट रूढी परंपरा,निरक्षरता,अज्ञान इत्यादी समस्यांनी ग्रासलेल्या काळात २६ जून १८७४ रोजी कोल्हापूर येथे त्यांचा जन्म झाला.शाहू महाराज नावाप्रमाणेच यशवंत राहिले. भारतमातेच्या पोटी अनेक थोरांनी,संता,महंता,राजे,महाराजे,समाज सुधारकांनी जन्म घेऊन भारतातील गोरगरीब दीन दुबळ्यांची मनोभावे सेवा केलेली आहे.पण राजर्षी शाहु महाराजा त्यांच्या पेक्षा काकन भर सरस आहेत.बहुजन हिताय बहुजन सुखाय हे सूत्र ध्यानात घूऊन शाहू महाराज राज्यकारभार पाहू लागले. स्वातंत्र्य,समता,बंधुता आणि न्याय याची फळे सर्व समाजाला चाखता यावीत म्हणून त्यांनी आपले सिंहासनच पणाला लावले.अज्ञान अंधश्रद्धा,निरक्षरता सामाजिक दुजाभाव,दारिद्र्य यात गुरफटलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी महाराजांनी आपला खजिना सताड उघड ठेवला.समाजातील गोरगरीब,दीनदुबळे, मागासवर्गीय,उपेक्षित व आर्थिकदृष्टय़ा दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणारे ते एकमेव राजे होते. सुरूवातीस कोल्हापूर संस्थानात आरक्षणाचा कायदा लागू केला.समता प्रस्थापित करण्याच्या ध्येयाने अस्पृश्यता निवारणाकरिता जातीभेद निर्मूलन,बलुतेदारी पद्धतीवर बंदी आणली. स्त्री शिक्षण,देवदासी प्रथेचे उच्चाटन, महिला संरक्षण कायदा,विधवा पूनर्विवाह कायदा,आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन यासारख्या परीवर्तनवादी मुद्दे प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचे धाडस त्यांनी केले व त्यांची अंमलबजावणी होते की नाही ते स्वत: खात्री करून घेत असत. स्त्री हक्क स्वातंत्र्यासाठी त्यांनी पुढाकार घेऊन पत्नीला त्रास देणाऱ्या पतीसाठी शिक्षेच्या कायद्याची तरतूद केली.अनिष्ठ रुढी परंपरा उच्चाटनासाठी प्रयत्न केले. १९१७ मध्ये विधवा पूनर्विवाह कायदा व विवाहनोंदणी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली.शंभर वर्षापूवी शाहूराजांनी ज्या दूरदृष्टिने निर्णय घेतले,त्याच्या जवळपासही आजचे राज्यकर्ते जाऊ शकत नाहीत.मानवी जीवनाच्या विकासाचे असे एकही क्षेत्र नाही,ज्यासाठी महाराजांनी काम केले नाही. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. राधानगरी धरण बांधून सिंचनाची सोय केली. कुस्तीला प्रोत्साहन दिले. कोल्हापुरात प्रत्येक जातीसाठी स्वतंत्र वसतिगृहे सुरू करून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात क्रांतिकारक कार्य केले.फासेपारध्यांच्या पुनर्वसनासाठी त्यांनी राबवलेली बांधकाम योजना राज्यकर्त्यांना नेहमीच मार्गदर्शक ठरणारी आहे.हे सगळे करीत असताना समाजातील विशिष्ट वर्गाशी त्यांना मोठा संघर्ष करावा लागला.संघर्ष करतानाही त्यांनी विकासाची वाट आणि तळागाळातील घटकांप्रती असलेली बांधिलकी याचा कधी विसर पडू दिला नाही. प्रस्थापितांनी त्यांच्या बदनामीच्या कहाण्या रचल्या. परंतु नव्या पिढीतल्या इतिहास संशोधकांनी त्या कहाण्या म्हणजे हितसंबंध दुखावलेल्या मंडळींनी रचलेली कुभांडे असल्याचे सिद्ध केले आहे. बहुजन व मागासवर्गीय समाजातील मुला-मुलींना परिपूर्ण शिक्षण मिळाल्याशिवाय त्यांचा बौद्धिक, सामाजिक व आर्थिक विकास शक्य नाही हे महाराजांनी हेरले व ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावाला शाळांची निर्मिती केली व शिक्षण सक्तीचे केले, एवढे करून न थांबता त्यावरील शुल्क माफ केले. जे पालक आपल्या पाल्यांना रोज शाळेत पाठविणार नाही अशा पालकांना प्रतिमहिना एक रुपया दंड आकारण्याची कायदेशीर तरतुदही केली. तसेच त्यांनी वसतीगृहे उभे केलीत, गरिब विद्यार्थ्यांसाठी तर त्यांनी आपला राजवाडाच खुला केला. यामुळे बहुजन व दलित समाजातील विद्यार्थी-विद्यार्थीनींना शिक्षणाचे दरवाजे खुले झालेत.८ सप्टेंबर १९१७ रोजी सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा जाहिरनामा काढला. २१ मे १९१९ रोजी आर्थिक दृष्टय़ा दुर्बल विद्यार्थ्यांना फी माफीचा निर्णय घेतला. १ जानेवारी १९१९ रोजी आज्ञा देवून प्राथमिक शाळा व महाविद्यालयातील अस्पृश्य मुलांना स्पृश्य मुलांसारखीच समानतेची वागणूक द्यावी म्हणून शिक्षण खात्याला आदेश दिला. ३० सप्टेंबर १९१९ रोजी अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा बंद केल्यात. ६ जुलै १९०२ मागास जातींना नोकरीत ५० टक्के जागा राखीव ठेवण्याची घोषणा केली. २३ पेब्रुवारी १९१८ ला कुलकर्णी वतने बंद, तलाठी सुरू. आंतरजातीय विवाह कायदा १५ एप्रिल १९२० नाशिक येथे उदोजी मराठा विद्यार्थी वसतीगृहाचा कोनशिला समारंभ केला. १९ नोव्हेंबर १९२१ मध्ये रायगड येथे शिवस्मारकाचा पायाभरणी समारंभ प्रिन्स ऑफ वेल्सच्या हस्ते झाला. तसेच सिंधूदुर्ग जिल्ह्य़ातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराचा जिर्णोद्धार ही केला. १६ फेब्रुवारी १९२२ दिल्लीत भरलेल्या अखिल भारतीय अस्पृश्य परिषदेचे ते अध्यक्ष होते.आजच्या बहुसंख्य मराठा समाजाला हा इतिहास माहित नाही.आमच्या सारख्या आंबेडकरी चळवळी तील लोकांनी सांगितला तर तो त्यांना पचत नाही. आदरणीय पुरुषोत्तम खेडेकर यांनी मराठा सेवा संघाच्या मराठा मार्ग मध्ये लिहले होते की डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना मराठा समाजाचे राजर्षी शाहु महाराज यांनी शिक्षणा साठी खुप मोठी मदत केली. म्हणून बाबासाहेब भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार झाले.हे आंबेडकरी चळवळीच्या लोकांनी विसरु नये.त्याकरिता आंबेडकरी चळवळी तील जाणकार बुद्धिजीवी लोकांनी अज्ञानी अंधश्रद्धा मध्ये गुंतलेल्या मराठा समाजाच्या घरी जाऊन समाज प्रबोधन करावे.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे आम्हाला शाहु महाराज सयाजी महाराज कबीर महात्मा ज्योतिराव फुले आणि तथागत बुद्ध कळाले. म्हणुन आमच्या सारखे लोक नेहमी मराठा समाजा बरोबर मंगल मैत्री करण्याचा प्रयत्न करतो.पण त्याचा अर्थ खेड्या पाड्या तील मराठा समाजातील लोक महार माजले त्यांना जास्त माझ आला असा काढतात.राजर्षी शाहु महाराज यांच्या आरक्षण देणाऱ्या २६ जुलै १९०२ या दिवसाला आज २०२४ ला १२२ वर्ष पूर्ण होतील.निमित्य सर्व मराठा समाजाला नम्र आवहान आहे की प्रथम शाहु महाराज समजून घ्या त्यानंतर आपले खरे शत्रु कोण व खरे मित्र कोण हे समजून येईल.आरक्षणची गरज आज कोणा कोणाला आहे हे सर्व सरकारी खात्यातील आडनावे तपासून पहा,शाळा महाविद्यालये कोणाच्या नियंत्रणा खाली चालतात ते पहा. मंदिरावर कोण्या जातीचा जन्मसिद्ध अधिकार आहे. तिथे शंभर टक्के आरक्षण त्यांना का लागू आहे. मंदिराच्या दररोजच्या उत्पन्नावर कोणाचा अधिकार आहे. हे प्रश्नच मराठा ओबीसी समाजाला पडत नाही. ते फक्त मागासवर्गीय एस सी, एस टी ची शैक्षणिक सामाजिक,आर्थिक आणि राजकीय परिस्थिती पाहतात. हे सर्व त्यांना आरक्षणामुळेच मिळाले असा त्यांचा गैरसमज आहे. त्यांनी अंधश्रद्धा सोडून विज्ञान स्वीकारले मंदिरात जाणे सोडून शाळा कॉलेज मध्ये जाणे जास्त पसंत केले. त्यांनी सर्वच कर्मकांड करणे सोडले म्हणूनच त्यांची प्रगती झाली. केवळ आरक्षणामुळेच त्यांची प्रगती झाली आणि ते ब्राह्मण समाजाला प्रत्येक क्षेत्रात समोर समोर आव्हान देतात.स्पर्धा करतात हेच ब्राम्हणाना जड जाते म्हणूनच ते मराठा ओबीसी समाजात आरक्षणा वरुण तेड निर्माण करण्याचे जीवतोड प्रयत्न करीत आहेत.राजर्षी शाहु महाराज यांच्या १२२ व्या आरक्षण घोषणा दिना निमित्य सर्व बहुजन समाजाला विशेष मराठा ओबीसी समाजाला विनंती आहे की त्यांनी वस्तुस्थिति सत्य परिस्थिती समजून घ्यावी आणि कोणा बरोबर संघर्ष करावा हे ठरवावे.

**सागर रामभाऊ तायडे ९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई**

## प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

लातूर, - येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या ६८ व्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना गणवेश, शालेय साहित्याचे वाटप व ६८ वृक्षांची लागवड करण्यात आली. यानिमित्त प्राचार्य केंद्रे त्यांच्यावर विविध मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

प्राचार्य केंद्रे यांच्या वाढदिवसानिमित्त माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी शुभेच्छा पत्र व पुस्तक भेट दिवून अभिष्टचिंतन केले. प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्या 'आरसीसी'च्यावतीने डॉ. धर्मराज जांभळे व प्रमोद घुगे यांनी प्राचार्य केंद्रे यांचा शाल व संत ज्ञानेश्वराची मूर्ती भेट सत्कार केला. यावेळी प्राचार्य संगमेश्वर केंद्रे उपस्थित होते. माजी आमदार वैजनाथ शिंदे, शिक्षण मंडळाचे विभागीय अध्यक्ष सुधाकर तेलंग, शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे, शिक्षण सहसंचालक दत्तात्रय मठपती, नांदेडचे उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. किरण बोंदर, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अधीष्ठाता डॉ. सी. आर. बावीसकर, मुंबई स्काऊट ऍण्ड गाईडचे गोविंद केंद्रे, शिवशंकर बोंदर, क्रीडा मंत्र्यांचे स्विय सहायक भगवान कासले, मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश देशमुख, संस्थाचालक संघटनेचे अध्यक्ष रामदास पवार, उपाध्यक्ष जे. जी. सगरे, सचिव बाबूराव जाधव, वसतिगृह संघटनेचे अध्यक्ष नितीन पवार, माधव केंद्रे, दिलीप पाटील, प्राचार्या डॉ. उर्मिला धूत, प्राचार्य बाबासाहेब गोरे, एकनाथ पाटील, पोलीस निरीक्षक तिडके, सुभाष धोंडगे, प्रा. नरहरी फड, लक्ष्मण बालवाड, प्राचार्य डॉ. आर. एम. चव्हाण, एस. एम. नवघरे, रघुवीर गोडभरले, सीता पुरी, प्रदीप चिद्रे, प्रा. माधव जाधव, वसतिगृह संचालक विजय जाधव, संदीप मैंदर्गीकर आदींनी वाढदिवसानिमित्त प्राचार्य केंद्रे यांना शुभेच्छा दिल्या.

# वडार गल्लीसह शहरात अनेक वार्डात घाणीचे साम्राज्य ; नागरिकांचे आरोग्य धोक्यात,भोकर नगर परिषदेचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

**भोकर / सिद्धार्थ जाधव / शहरातील वडार गल्लीसह अनेक वार्डात जागोजागी कचऱ्याचे ढिगारे साचल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण झाले. याकडेमात्र भोकर नगर परिषदेचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे, अशी संताप जनक तक्रार शहरातील वडार गल्ली तसेच अनेक वार्डाच्या परिसरातील नागरिकांनी समाज माध्यमातून केली असून ही कचऱ्याचे ढिगारे हटवून स्वच्छता करण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे.**

भोकर परिषदेअंतर्गत येणाऱ्या पोलीस स्टेशनचा पाठीमागील भाग,वडार गल्ली, शाहू शाळे समोरील परिसर, शेख फरीद नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते महात्मा गांधी चौक, नूतन शाळेच्या पाठीमागील भाग, पंचायत समितीचे गोदाम परिसर, डॉ. आंबेडकर नगर शहरातील आदी भागासह अनेक वॉर्डांतील विविध भागांत कचरा योग्य प्रकारे उचलला जात नसल्याने जागोजागी रस्त्याच्या बाजूला कचऱ्याच्या ढिगाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. मोकाट कुत्रे जनावरांचा या कचऱ्याच्या आसपास मुक्त संचार असतो. त्यामुळे पायी चालणाऱ्या नागरिकांनाही त्रास होतो.यामुळे घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याने दुर्गंधीमुळे परिसरातील रहिवासी त्रस्त झाले असून नागरिकांच्या आरोग्य धोक्यात आले आहे. योग्य प्रकारे कचरा संकलन करण्यासह परिसरात रस्त्याच्या कडेला टाकलेला कचरा उचलण्यात यावा,नाल्या साफसफाई करण्यात यावी अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत.अन्यथा शहरातील कचरा नगर परिषदेसमोर टाकल्या जाईल असा इशारा घाणीने त्रस्त झालेल्या भोकर वासियांकडून समाज माध्यमातून देण्यात येत आहे.





ज्या मतदारांच्या मतांवर निवडून येऊन नगर सेवकांचा कार्यकाळ संपल्याने ते आता वार्डात फिरकूनही भटकत नाहीत. आगामी नगर परिषद निवडणूक वेळी हे नगरसेवक पुन्हा निवडणुकीत उभे रहावे आणि वार्डात यावे याची सध्या नागरिक वाट पाहताना दिसत आहेत.

**नपा कडून स्वच्छतेसाठी करोडो रुपये खर्च तरीही शहरात जागोजागी कचऱ्याचे ढिगारे**

भोकर वासियांकडून विविध प्रकारची भरमसाठ कर वसुली करून नगरपरिषदेकडून शहर स्वच्छतेसाठी करोडो रुपयांचे टेंडर देऊनही शहरात जागोजागी कचऱ्याचे ढिगारे साचल्याने घाणीचे साम्राज्य पसरले आहे. सद्या पावसाचे दिवस असल्याने मोठया प्रमाणात डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने मलेरिया , डेंग्यूच्या रूग्णांच्या संख्येत वाढ होत आहे.

शहरातील मुख्य रस्ता व काही राजकीय नेते, माजी नगराध्यक्ष यांच्या घराच्या आजूबाजूला नाली काढणे व स्वच्छता करण्याचे काम संबंधित ठेकेदार व नगर परिषदेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून चालू आहे. यासह शहरातील एका राजकीय नेत्याच्या घरी नगर परिषदेतील कर्मचारी काम करित असल्याचे सांगल्या जात आहे.उर्वरित सर्वसाधारण गल्ली,भागात महिन्या-दोन महिन्याला कधीतरी एखाद्या वेळेस स्वच्छता व नाल्या काढण्यात येत आहेत. आदी भागात जागोजागी तुंबलेल्या नाल्या व साचलेली घाण पहावयास मिळत आहे. असे असताना नगरपालिकेचे याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष असल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे.

---

**कृतघ्न ..**

पावसाळा देईकळा
लपंडाव वीज करी
शिव्या वीज मंडळा
भडीमार फोन वरी
वीज बील थकलेले
ना काही जिम्मेदारी
सेवा मात्र तत्परतेने
घर पोच हवी दारी
कामामधे व्यग्र असे
वायरमन कर्मचारी
भिजला का बोल रे
कोण तया विचारी
चढताना पोल वरी
उदार ते जीवा वरी
सगळे समान त्याले
प्रेम करी गावा वरी
प्रकाशा न्हाहे सारी
त्यांचीचं कामगिरी
धन्यवाद शब्द सांग
कधीआलेओठावरी
काम त्यांचे ते करी
बोल लावी परोपरी
कृतघ्नता ठासलेली
नाही होत उपकारी

२
**पावसा ..**

बरसतो संततधार
थांब अंमळ पावसा
असशीलं दमलेला
श्र्वास घ्यावा जरासा
प्रिया तिथेअडकली
तुझाचं मज भरोसा
येऊ दे तिला इथे
शोधलायं आडोसा
तळमळतो विरहात
भेटीची तीव्र मनसा
विनवी विनये तुला
विश्राम घ्या छानसा
उपकृत केले आम्हां
थांबलास अमंळसा
आलीमाझी लाडकी
दिसे सुख कवडसा
छत्रीत एका मावलो
बरसआता हवातसा
प्रेमात चिंब भिजलो
दावी तव स्नेह रसा
प्रियेला जायचे वेध
अडवं तिला पावसा
प्रेमी युगलं मित्र तूचं
केवळ तव भरवसा

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६..**

## त्यांच्या वाणीतून....

यापूर्वीही मला आणि माझ्या कुटुंबाला दुखावण्याचा प्रयत्न झाला होता. या हल्ल्याची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोईने सोशल मीडियाच्या माध्यमातून घेतल्याचे मला समजलेय. त्यामुळे लॉरेन्स बिश्नोई गँगने माझ्या बाल्कनीत गोळीबार केला असे मला वाटते.

**— सलमान खान**

यवतमाळ जिल्ह्यातील खरीप हंगामातील पीक विमा योजनेत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांच्या पंचनाम्याविषयक तक्रारी दूर करून पात्र शेतकऱ्यांना तात्काळ पीक विमा योजनेअंतर्गत लाभाचे वितरण करावे.

**- कृषिमंत्री धनंजय मुंडे**

### माजी सैनिकांच्या कल्याणासाठी महामंडळ स्थापन करणार

मुंबई, : माजी सैनिकांच्या कल्याणासाठी महामंडळ स्थापन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे यासंदर्भात बैठक झाली. यावेळी माजी सैनिकांच्या विविध विषयांसंदर्भात आढावा घेण्यात आला.

# मुलींनीही संशोधन क्षेत्रात अग्रेसर राहून वैज्ञानिक क्षेत्रात नावलौकीक करावे: डॉ. रोहिणी शिंदे

लातूर: येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागात दि.२५ जुलै २०२४ रोजी महिला वैज्ञानिक ' रोजा फ्रँकलिन' यांची १०४ वी जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे, संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. रोहिणी शिंदे व कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव यांनी वैज्ञानिकांच्या प्रतिमेस वंदन करून केली.याप्रसंगी डॉ. रामशेट्टी शेटकार,डॉ.कोमल गोमारे,डॉ.श्रेयस माहुरकर,डॉ. नितीन चव्हाण, प्रा.कृष्णकुमार सारडा,प्रा.सुभद्रा परगे आणि सुदाम सातपुते यांची प्रमुख उपस्थिती होती.जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.श्र्वेता मदने यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.



महिला वैज्ञानिकाच्या जयंतीचे औचित्य साधून संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ.रोहिणी शिंदे यांनी वैज्ञानिकांच्या जयंतीनिमित्त घेतल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रम व त्यातून विद्यार्थ्यांचा वाढणारा आत्मविश्र्वास या बाबींचे कौतुक केले. त्याचेच एक उदाहरण म्हणून त्यांनी जैवतंत्रज्ञान विभागातील महाराष्ट्र कौशल्य इंनोवेशन स्पर्धेतील विजेते विद्यार्थी जानवी अंबर व प्रकाश गवळी यांना प्रत्येकी १ लाख रुपयाचे बक्षीस भेटले असून ते चांगले संशोधन करतील असे मत व्यक्त केले.प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी अशा प्रकारच्या कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदवत संशोधन क्षेत्रात नावलौकीक करावा,असे मत व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या मनात संशोधनाचे बीज रुजवले.आज ज्या महिला वैज्ञानिकाची जयंती आपण साजरी करत आहोत त्यांनी कुठल्याही कामाच्या श्रेयाची अपेक्षा न करता सातत्याने मॉलिक्युलर स्ट्रक्चर ऑफ डीएनए, आरएनए ग्रॅफाइट कॉल व्हायरसेस यावर काम केले,तसे आपल्यापैकी काही महिला वैज्ञानिक घडाव्यात अशा शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांनी याप्रसंगी महाविद्यालयात होणारे कार्यक्रम हे विद्यार्थी केंद्रित असून यामागचा उद्देश संशोधन शैक्षणिक क्षेत्रात नामवंत विद्यार्थी घडविणे आणि त्यांचा सर्वांगीण विकास करणे असा असून त्यासाठी सातत्याने असे उपक्रम विविध विभागामार्फत केले जातात त्याचाच एक भाग म्हणजे वैज्ञानिकांची जयंती असून अशा कार्यक्रमासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

जैवतंत्रज्ञान विभागातील बी.एस्सी.द्वितीय वर्षातील पर्णवी ढवारे माहिती देताना म्हणाली की, रोझलिंड एल्सी फ्रँकलिन यांचा जन्म २५ जुलै १९२० मध्ये झाला होता. फ्रँकलिन ह्या एक ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ व क्ष-किरण क्रिस्टलोग्राफर होती.एका स्त्रीमधील सहनशक्ती आणि संकटांना सामोरे जाण्याचे बळ जास्त असते याचे उत्तम उदाहरण म्हणजे रोजलिंड फ्रँकलिन. संशोधनासाठी भेटलेली शिष्यवृत्ती गमावूनसुद्धा त्यांनी संशोधन करायचं थांबवलं नाही. एक केमिस्ट आणि क्रिस्टालोग्रफर याचबरोबर त्यांनी मॉलिक्युलर स्ट्रक्चर ऑफ डीएनए आरएनए ग्रॅफाइट कॉल व्हायरसेस यावर काम केलं. परंतु त्यांना त्यांच्या कामाचं श्रेय त्यावेळी मिळालं नाही. उलट त्यांच्या संशोधनाच्या मदतीने वॅटसन, क्रीक आणि विल्किन्सन या तीन वैज्ञानिकांना नोबेल पारितोषिक मिळालं. तरीसुद्धा त्या आयुष्यामध्ये थांबल्या नाहीत तर कुठल्या फळाची अपेक्षा न करता प्रयत्न करत रहा यश मिळेल आणि एक दिवस हे जग तुम्हाला नक्की ओळखील हे फ्रँकलिन यांच्या जीवन परिचयातून शिकायला मिळतं. आयुष्यामध्ये न थकता काम करणाऱ्या या महिला वैज्ञानिकाचा ओव्हेरियन कॅन्सरमुळे १६ एप्रिल १९५८ मध्ये मृत्यू झाला.

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मराठी विभाग प्रमुख डॉ.रामशेट्टी शेटकार यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बी.एस्सी.जैवतंत्रज्ञान, बी.एस्सी, सीएस प्रथम,द्वितीय आणि तृतीय वर्षातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर तालुक्यातील २ कोटी रुपयांच्या विकासकामांचे उद्घाटन व भूमिपूजन

लातूर / प्रतिनिधी : लातूर ग्रामीण विधानसभा मतदार



संघातील लातूर तालुक्यातील सुमारे २ कोटी २० लाख रुपयांचे विविध विकासकामांचे लोकार्पण आणि भुमिपजन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासरावजी देशमुख यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आले. या विकासकामामुळे नागरिकांची मोठी सोय होणार असल्याने नागरिकांनी यावेळी समाधान व्यक्त केले.

लातूर तालुक्यातील कासारखेडा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हा परिषद शाळेपर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता (१५ लक्ष) व श्री. संजय खंडागळे ते त्र्यंबक शिंदे यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता (१० लक्ष) या कामांचा शुभारंभ आमदार श्री. धिरज देशमुख यांच्या हस्ते झाला. त्यानंतर त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. कासारखेडा येथील सोहळ्यानंतर चिकलठाणा येथे स्थानिक आमदार निधीतून झालेल्या महादेव मंदीर ते श्री प्रताप पाटील यांच्या घरापर्यंतच्या सिमेंट रस्ता (१० लक्ष), बारा ईमाम मंदीर परिसरात पेव्हर ब्लॉक (७ लक्ष), चिकलठाणा ते पांढरी रस्ता मातीकाम व मजबुतीकरण (२४ लक्ष), दलित वस्तीत २५ केव्हीए क्षमतेचा नवीन डीपी आदी विविध विकासकामांचे लोकार्पण त्यांच्या हस्ते झाले.

सलगरा खु. येथे आमदार निधीतून बांधण्यात आलेल्या अंबाबाई मंदिरासमोरील सभागृह (७ लक्ष), दलित वस्तीतील पेव्हर ब्लॉक (१० लक्ष), झोपडपट्टीवरील दलित वस्तीमधील पेव्हर ब्लॉक व नाली काम (१० लक्ष), दलित वस्तीतील विद्युतीकरण (५ लक्ष) आदी कामांचे आमदार श्री. धिरज देशमुख यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. येथील श्री खंडोबा मंदिरासमोरील खुल्या जागेत सभागृह (१० लक्ष) उभारले जाणार असून याच्या बांधकामाचे भूमिपूजनही यावेळी करण्यात आले.

शिवणी खुर्द (ता. लातूर) येथील नूतन ग्रामपंचायत इमारत (२० लक्ष), मनरेगांतर्गत पेव्हर ब्लॉक रस्ता (१० लक्ष), श्री. मुसा शेख यांचे घर ते श्री. सिकंदर शेख यांच्या घरांपर्यंत नाली बांधकाम (१० लक्ष), दलित वस्तीतील पेव्हर ब्लॉक रस्ता (१४ लक्ष), पाणंद रस्ता (३६ लक्ष), जलजीवन अंतर्गत पाईपलाईन काम आणि चामेवाडी येथील नवीन विद्युत उपकेंद्राचे लोकार्पण आमदार श्री. धिरज देशमुख यांच्या हस्ते झाले. श्री. वसंत शिंदे यांचे घर ते श्री हनुमान मंदीर ते श्री माधवराव लातुरे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता व नालीकाम करणे (१० लक्ष), मनरेगातून गावांतर्गत सिमेंट रस्ता (१० लक्ष) या कामाचे भूमिपूजनही त्यांनी केले.

यावेळी प्रमोद जाधव, सुभाष घोडके, अनुप शेळके, राजकुमार पाटील, सुनील पडिले, दगडूसाहेब पडिले, प्रवीण पाटील, प्रतापराव पाटील, बालाजी वाघमारे, रघुनाथ शिंदे, श्रीकांत बैले, नंदकुमार देशमुख, पंडित ढमाले, शंकर बोळंगे, बळवंत पाटील, आबासाहेब देशमुख, महेश जाधव, महेंद्र देशमुख, बाबासाहेब पाटील, परमेश्र्वर पाटील, उत्तम बनसोडे, ग्रामसेवक उषा दुभते, लिंबराज पाटील, पंडित गायकवाड, परमेश्र्वर बावलगे, सलगरा खुर्दच्या सरपंच श्रीदेवी कांबळे, शंकर पाटील, कमलाकर अनंतवाड, बालाजी मनदुमले, भालचंद्र जाधव, युवराज जाधव, मुकेश जाधव, शिवणीचे सरपंच बाळू गायकवाड, उपसरपंच हरिपाल मोरे, ज्ञानोबा गवळे, सिध्देश्र्वर स्वामी, सरवर शेख, महावितरणचे कनिष्ठ अभियंता ओंकार तारळकर, वरिष्ठ तंत्रज्ञ सतिश गिरी, सुधाकर साठे, गणपत कल्लेकर, एकनाथ जाधव, दत्ता फड, बालाजी बालणे यांची उपस्थिती होती.

# उच्च व तंत्र शिक्षणात मुलींच्या शिक्षणाची टक्केवारी वाढणार कॅबिनेट मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांचे प्रतिपादन

लातूर : उच्च व तंत्र शिक्षणात शिकणाऱ्या मुलींची टक्केवारी ही ३६ टक्के असून मुलांची टक्केवारी ६४ टक्के आहे. मुलींचे प्रमाण ३६ टक्क्यावरून हे प्रमाण ५० टक्क्याच्यावर नेण्याचा प्रयत्न केला जाईल असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.



विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि महात्मा बसवेश्र्वर वरिष्ठ महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि.२५ जुलै २०२४ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत शिष्यवृत्ती योजना संबंधी संस्था पदाधिकारी, प्राचार्य, शाखा समन्वयक, विभाग प्रमुख, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांचा ऑनलाइन वेबीनार आयोजित करण्यात आला होता यामध्ये ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. विचार मंचावर संचालक विनोद मोहितकर, प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी आणि संचालक शैलेन्द्र देवळानकर यांची प्रमुख ऊपस्थिती होती.

पुढे बोलताना श्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, शासन निर्णयानुसार राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ई डब्ल्यू एस), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय (एस ई बी सी) तसेच इतर मागासवर्ग (ओबीसी) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करणे बाबतचा निर्णय झाला असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची समर्पक आणि विश्र्लेषणात्मक माहिती दिली यामुळे विद्यार्थी वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.

यावेळी मंत्री अतुल सावे यांनीहि विदहयार्थ्याना ऑनलाइन मार्गदर्शन केले.

महाविद्यालयातील या कार्यक्रमाचा समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी महाराष्ट्र सरकार, कॅबिनेट मंत्री, संचालक आणि इतर सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करून या निर्णयाचा लाभ सर्व विदहयार्थ्यांनी घ्यावा असे सांगून उपस्थित संस्था पदाधिकारी, प्राचार्य, सर्व शाखा समन्वयक, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी यांचे आभार व्यक्त केले.

या कार्यक्रमाला संस्था पदाधिकारी, प्राचार्य, सर्व शाखा समन्वयक, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर सहभागी होते.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५ (पी.आर.बी.कायद्यानुसार)